# "डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पत्रकारीतेमधील स्त्री-पुरष समानतेचा दृष्टीकोन"

**साधना रामचंद्र काळे,** संशोधक, जनसंवाद व विद्याविभाग,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

..........................................................................................................................................

**प्रस्तावना :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे बहुआयामी व्यक्तिमत्व होते. त्यांची जिद्द आणि विचारातील तत्वप्रणालीस कृतीची जोड देत संघर्षशील जीवन जगणारा, बुध्दीचा आणि बुध्दाचा प्रमाणतेने परिवर्तनाच्या चळवळीचा कणा ठरून चळवळीस नवा आयाम देत विश्वलक्षी कामगीरी करणारा महान विश्वनायक म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होय. एका बाजूला पिचलेल्या समाज्याच्या अवनत अवस्थेवर उपयोजना करून आमुलाग्र समाज परिवर्तन करण्याचे स्वप्न तर, दुस–या बाजूला प्रखर राष्ट्र निष्ठेने झपाटलेला, राष्ट्राच्या विकासाचा ध्यास घेणारा हा सामाजिक योध्दा अखिल मानवास दास्यशृखलातून मुक्तीचे स्वप्न पाहणा–या या महान मानवाचा एतिहासिक आणि अलाकीक कत्वृत्वास विषयाचे वा दिशांची बंधने नव्हतीच कशी होती ती केवळ फक्त विव्दत्तेची किमया.....डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे कायदेपंडीत, अर्थतज्ञ, झुंजार पत्रकार, बहुजनांचे उध्दारक, स्त्रीयांच्या प्रश्नांची प्रभावी पणे मांडणी करणारे लेखक व भाष्यकार आणि भारतीय संविधानाचे निर्माते म्हणून सर्वपरिचित आहेत. सर्वात महत्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री केवळ घरकाम करणारे साधन नसून पुरूषाप्रमाणेच राष्ट्रनिर्मितीमध्ये एक महत्वाचा घटक आहे असा व्यापक दृष्टीकोन त्यांनी भारतीय समाजामध्ये रूढ केला हे त्यांचे कार्य म्हणजे स्त्री–पुरूष समानतेच्या दृष्टीने मौलिक आहे.

**सामाजिक संशोधन पध्दत :**

प्रस्तुत संशोधन लेखाकरिता ऐतिहासिक संशोधन पध्दत उपयोगात आणली आहे. सदरचे वर्णनात्मक आराखडयाची मांडणी करून ऐतिहासिक तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**संशोधन उदि्दष्टये :**

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रीय कार्यालयातील स्त्री–पुरूष समानतेचा दृष्टीकोन अभ्यासणे.
2. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य ते स्त्री सक्षमीकरणाचे असल्याचे त्यांच्या पत्रकारितेमधून समाजासमोर आणणे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विशयक कार्ये :**

हिंदू कोड बिलाचा मसुदा लिहीण्याची जबाबदारी 1948 मध्ये जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर सोपवली गेली तेव्हा त्या विधेयकाच्या माध्यमातून आंबेडकरांनी भारतातील बहूविविध समाजव्यवस्था आणि संपत्तीच्या व्यवहारांना एकत्रसुत्री करण्याचा प्रयत्न केला. स्त्री आणि पुरूष यांच्यात ती तफावत होती. वारसा हक्काची जी व्यवस्था होती त्यामध्ये अमुलाग्र बदल होवून नवे कायदे अस्तित्वात यावेत आणि त्यातून पोटगी, विवाह, घटस्फोट, दत्तक, पालकत्व या संदर्भात नवा मार्ग शोधावा असा त्यांचा आग्रह होता. यामध्ये बाबासाहेबांनी सर्वप्रथम वारसा हक्काचा प्रश्न घेतला. वडीलोपार्जित संपत्तीमध्ये मुलींनाही अर्धा हिस्सा मिळावा तसेच मुलीने माहेरून हुंडयाच्या रूपात आणलेली संपत्ती त्यास मालमत्ता मानली जाईल. तिचा उपयोग स्त्रीला करता येईल. तिच्या पतीला किंवा नातेवाईकांना उडविता येणार नाही. स्त्रीयांच्या` मर्यादित इस्टेटीच अबाधित इस्टेटीत रूपांतर, याशिवाय विवाह, दत्तक विधानातून जातीचे उच्चाटन, एकपत्नीकत्व तत्व आणि विवाहातून बाहेर पडण्यासाठी घटस्फोटाचे तत्व यांची तरतूद विधेयकात करून स्त्रीयांना फार मोठा दिलासा दिला. बाबासाहेब आंबेडकरांनी मजुरमंत्री असताना त्यांनी स्त्री मजुरांच्या हिताचे संरक्षण केले. खाणीमधील स्त्री कामगारांना बाळांतपणापूर्वीच्या चार आठवडयांच्या काळात तिला प्रसुती भत्ता मिळण्याचा हक्क राहील असा कायदा केला. कोळशाच्या खाणीमध्ये काम करण्या–या स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने मजुरी दिली जाईल असे घोषित केले.

1) कोणत्याही स्त्रीला प्रसुतीपूर्व दहा आठवडे व प्रसुतीनंतर चार आठवडे तिने पूर्ण विश्रांती घ्यावी.
2) या विश्रांतीच्या काळात दिवसाला बारा आणे याप्रमाणे मोबदला दिला जाईल. या प्रकारच्या स्त्री कामगाराच्या प्रश्नांना वाचा फोडून न्याय देण्याचा प्रयत्न केला.

22 डिसेंबर 1930 च्या बैठकीत प्रौढ मतदानाच्या हक्कासंबंधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरा म्हणतात की, 21 वर्षावरील प्रत्येक भारतीय स्त्री – पुरूषांना मतदान अधिकार असावा. आजच्या भारतीय राजकारणात सामाजिक सुधारण्याच्या कार्यात जे कार्य दिसून येते त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्याचे महत्वपूर्ण असे योगदान आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची वृत्तपत्रे :**

भारताच्या इतिहासातील अतिशय महत्वपुर्ण नावापैकी एक नाव म्हणजे डॉ. भिमराव रामजी अर्थात बाबासाहेब आंबेडकर, पत्रकार, लेखक, भारतीय घटनेचे शिल्पकार असे हे बहुजन उध्दारकर्ते, बहूआयामी व्यक्तिमत्व, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 31 जानेवारी 1920 रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरू केले. बहुजनांच्या प्रगतीमध्ये या वृत्तपत्राचा महत्वाचा वाटा होता. काही कारणास्तव हे पत्र बंद पडल्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ''बहिष्कृत भारत'' या वृत्तपत्राचा मुंबईमध्ये 3 एप्रिल 1927 रोजी पहिला अंक काढला. बाबासाहेबांनी ''बहिष्कृत भारत'' या पाक्षिकांचे संपादक म्हणून काम पाहिले. या पाक्षिकामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विविध विषयांवर सडेतोड लिखाण केले. यामध्ये विविध प्रश्न, प्रासंगिक विचार, स्त्रीयांवर आधारित विविध लेख अशा विषयांवर त्यांनी आपली मते मांडली. ''31 ऑक्टोबर 1931 रोजी जनता साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला. समता समाज संघातर्फे बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली 29 जून 1928 ला समता नावाचे पाक्षिक सुरू केले.'' जनता साप्ताहिकाच्या शेवटच्या अंकात बाबासाहेबांच्या नावाने एक निवेदन प्रसिध्द करण्यात आले. या प्रबुध्द भारताचा पहिला अंक 4 फेब्रुवारी 1956 रोजी प्रकाशित करण्यात आला. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता ही समाजहिताची सडेतोड लिखाणाची आहे.

**बाबासाहेब यांच्या पत्रकारितेतील स्त्री, पुरूश समानता विषयक मजूकर :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या मूकनायक पाक्षिकामध्ये स्त्रीशिक्षणाचे माननीय उद्गाार हा लेख प्रकाशित केला. त्यामध्ये त्यांनी स्त्री शिक्षणाचे महत्व सांगून स्त्रीया या संपूर्ण समाजाचे अर्धांग आहेत. या स्त्रीया अशिक्षित राहिल्यास समाजाची सुधारणा व उन्नती झाली असे म्हणता येणार नाही. पुरूषाच्या पेक्षा स्त्रियांस शिक्षण देण्याची आवश्यकता आहे.

ग्रहव्यवस्थेची मुलाबाळांच्या संगोपन संवर्धनाची जबाबदारी स्त्रीवर असते, म्हणून सुशिक्षित स्त्रीया अशिक्षित स्त्रीयांपेक्षा सरस ठरतात. स्त्री शिक्षणाची महती तर फारच आहे. आपल्या स्त्रीया सुशिक्षित झाल्या शिवाय आपणांस आपले पूर्व वैभव प्राप्त करून घेता येणार नाही. कोणत्याही स्थितीतील मनुष्य आपली सुधारणा करू इच्छितो. शिक्षणाशिवाय कशानेही सुधारणा होणार नाही. शिक्षणाने सर्व प्रश्न सुटतील तेव्हा आताच्या परिस्थितीनुसार योग्य असे शिक्षण आपल्या मुला–मुलीस दया असे आंबेडकरांनी त्यांच्या लेखनीतून मांडले. आपल्या देशात सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय देशाची सामाजिक, आर्थिक, राजकीय सुधारणा होणे शक्य नाही, हे जाणून आपण आपल्या शिक्षणाकडे वळले पाहिजे.

मुलींना शिक्षण दिल्यास त्यांच्यात स्वाभीमानाची ज्योत प्रज्वलित होईल. या लिखाणातून आंबेडकरांना ऐवढेच सुचवायचे आहे की, बहिस्कृत समाजाला आपली उन्नती होवून आपण इतर पुढारलेल्या लोकांच्या बरोबरीने यावे असे वाटत असल्यास त्यांनी आपल्या उन्नतीगाडयाचे दुसरे चाक म्हणजे स्त्री समाज. त्यांनाही आपल्या बरोबरीने शिक्षणाचा लाभ मिळवून दिला पाहिजे, तरच आपला उन्नतीगाडा नीटपणे चालून लवकरच आपल्या इच्छित जागी सुरक्षितपणे पोहचेल. आपल्या मुलामुलींच्या प्राथमिक सक्तीच्या शिक्षणाच्या पवित्र कायदयाची अंमलबजावणी करून घेवून आपल्या भावी पिढीस शिक्षामृत उन्नतीशिखरास पोहचवण्याचा मार्ग सुलभ करावा.

**ठळक निष्कर्श :**

1. स्त्रीयांना पुरूषांप्रमाणेच शिक्षणाचा हक्क डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मूकनायकमधील विविध प्रकारच्या आशय प्रकारामधून व्यक्त केल्याचे दिसते.
2. मुला –मुलींना समान शिक्षण देवूनच सामाजिक सुधारणा करता येवू शकतात, असेही डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या पत्रकारितेमधून सांगतात.
3. कुटूंबाच्या प्रगती व उन्नती करिता स्त्रीयांना स्वाभिमानाची वागणूक मिळावी, असा दृष्टीकोन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वृत्तपत्रांमधून दिसून येतो.
4. पुरूषांप्रमाणे स्त्रीयांनाही मतदानाचा हक्क मिळावा असा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडला.

5. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांनाही प्रसुतीच्या काळात हक्काची रजा मिळावी यासाठी कामगार कायदात महत्वाचे बदल केले.
6. पुरूष कामगारांप्रमाणेच स्त्रीयांनाही तीच समान मजुरी मिळावी, अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडल्याचे दिसते.

**सुचना :**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते होते, त्यांचा स्त्री विषयक दृष्टीकोन आजच्या पत्रकार, संपादक व सामाजिक कार्यकर्त्यांनी अभ्यासावा.
2) स्त्री–पुरूष समानतेच्या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या कार्याचा ग्रंथरूपाने अभ्यास व्हावा.
3) स्त्रीयांच्या उन्नतीकरीता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या हिदूकोड बिलाची नव्याने निर्मिती करावी.

**समारोप :**

अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांना समाजामध्ये उंच मानाने जगण्यासाठी स्त्रीयांच्या बाबतीत वेगवेगळे कायदे करून, ते आमलात आणले. स्त्रीयांना सुशिक्षित करून समाजाची प्रगती करण्याचा प्रयत्न केला. स्त्री स्वातंत्र्याचा आणि समानतेचा पुरस्कारही त्यांनी केला. स्त्रीयांना सर्व हक्क मिळावेत आणि त्यासाठी स्त्रीयांना आत्मभान यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत संघर्षची भूमिका घेतली. स्त्री–पुरूषांनी एकत्रित राहूनच शिक्षण घेतले पाहिजे, हा सहशिक्षणाचा त्यांचा आग्रह अन्वर्थक आहे. स्त्री–पुरूष समानतेचा हा मूलमंत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समाजाला दिला.

**संदर्भ साहित्य :**

1) बावडेकर ऋता, महाराष्ट्रातील प्रमुख संपादक, डायमंड पब्लिकेशन 18 नोव्हेंबर 2009 पान नं. 83, 85, 86
2) शहापूरकर भूषण, राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रकाशन, औरंगाबाद 6 डिसेंबर 2016 पृ. क्र. 135, 137, 140
3) संपादक मून वसंत, नरके हरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बहिस्कृत भारत आणि मूकनायक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि राजर्षी शाहू चरित्र साधने प्रकाशन समिती उच्च व मंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन 2008 पृ. क्र. 418.
4) पाटणकर म्हैसकर मनिषा (संपादक) लोकराज्य (अंक 8 वा) ऑक्टोबर 2006 प्रवर्तन सुवर्ण महोत्सव विशेषांक.
5) संपादक पवार श्रीराम, सकाळ (दिशा विशेषांक 2015) सकाळ प्रकाशन.
6) संपादक व्ही. पी. अन्वीक्षण अंक 1 ला 4 एप्रिल जे जून 2011
7) कठारे अनिल, फुले, शाहू आंबेडकर, पूनम प्रकाशन 1 एप्रिल 2011 पान नं. 154, 155.
8) लूलेकर प्रल्हाद, दलितेतरांसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सायन पब्लिकेशन्स, 2012 पान नं.87,88.